“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। बहुरत्ना वसुंधरा ।।

मूल्य रु. ५

क्रमांक ३ वर्ष : ४५ ऑक्टोबर–डिसेंबर २०२३

BOOK PACKET

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

TO,

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

**दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी**

## *वार्षिक स्नेह संमेलन २०२३*

## निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास सहाय्य करावे.

**: प्रमुख पाहुणे :**

डॉ. निनाद अनंत गंडभीर यांचा परिचय दादासाहेब फाळके प्रशस्तीपत्र मिळाल्याबद्दल मुखपत्रिकेच्या प्रकाशझोतध्ये एप्रिल–जून–२०२३ च्या अंकात आला आहे.

स्थळ : **प्राचार्य बी.एन्. वैद्य सभागृह,**

आय.ई.एस्. हायस्कूल, दादर (पूर्व),

**दिनांक : रविवार १९ नोव्हेंबर २०२३, सायं. ४.१५ वाजता**

**कार्यक्रम**

* स्वागत गीत
* संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
* प्रमुख पाहुण्यांचे मनोगत.

**......मध्यंतर......**

* विवाहाची सुवर्ण जयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
* एज्युकेशन सोसायटी तर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना डॉ. निनाद गंडभीर यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| **मारुती वि. दळवी** | **देवदास अ. नाडकर्णी** |
| **कार्याध्यक्ष–संघ** | **कार्याध्यक्ष–एज्युकेशन सोसायटी** |

# संपादकीय

येत्या १९ नोव्हेंबर २०२३ रोजी आपल्या एन्.के.जी.एस्.बी. संघ व एन्.के.जी.एस्.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्युकेशन सोसायटी तर्फे दरवर्षीप्रमाणे वार्षिक स्नेह संमेलन करण्याचे योजिले आहे. या वर्षी ह्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून आपण डॉ. निनाद अनंत गंडभीर यांची निवड केली आहे.

डॉ. निनाद गंडभीर यांचा परिचय ''दादासाहेब फाळके'' प्रशस्तीपत्र दिल्याबद्दल मुखपत्रिकेच्या ''**प्रकाश झोत**'' मध्ये यापूर्वी एप्रिल–जून २०२३ च्या अंकात देण्यात आलेलाच आहे. चित्रपट सृष्टीत दादासाहेब फाळके स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारे प्रशस्तीपत्र हे प्रतिष्ठित समजले जाते. ज्या मान्यवरांचे इतर क्षेत्रांत महत्त्वाचे योगदान असेल अशांनाही प्रशस्तीपत्र देण्याचे यंदा विश्वस्तांनी ठरविले. त्यानुसार वैद्यकीय क्षेत्रात दैदिप्यमान कारकीर्द बजावणारे शिवाजी पार्क येथील डॉ. निनाद गंडभीर यांना पहिलेच प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. गेल्या चार तपांहून अधिक काळापासून डॉक्टर परळ भागातील गरीब व सर्वसामान्य रूग्णांची सेवा अत्यंत प्रभावीपणे व निस्वार्थीपणे बजावित आहेत.

त्यांचा थोडक्यात परिचय करून देताना इथे नमूद करावेसे वाटते की डॉ. निनाद गंडभीर हे M.B.B.S. व PGDMLS आहेत. त्यांचे शालेय शिक्षण : बालमोहन विद्यामंदीर, महाविद्यालयीन शिक्षण : राम नारायण रुईया कॉलेज, वैद्यकीय शिक्षण : जी. एम्. मेडीकल कॉलेज, परळ, के.ई.एम. हॉस्पिटल येथून एम.बी.बी.एस.,ग्लोबल इंस्टिट्युट मधून PGDMLS त्यानंतर के.ई.एम्. हॉस्पिटलमध्ये मेडीसीन डिपार्टमेंटमध्ये ६ महिने व वाडीया (Children) हॉस्पिटलमध्ये ६ महिने.

२७ जून १९७९ रोजी भोईवाडा, परळ विभागात जनरल प्रॅक्टीसला सुरुवात केली. गेली ४३ वर्षे भोईवाडा, परळ विभागातील जनतेची विश्वासाने, प्रामाणिकपणे वैद्यकीय सेवा करीत आले आहेत. डॉ. निनाद गंडभीर यांनी त्यांना आलेल्या अनुभवांचे चित्र मांडण्यासाठी ''आकल्पित'' हे पुस्तक गेल्याच वर्षी लिहून प्रसिद्ध केले आहे. त्यांच्या आयुष्यात आणि दवाखान्यात शेकडो माणसे आली असतील त्यातले काही मोजकेच प्रसंग त्यांनी उत्तमरित्या मांडले आहेत. त्यांनी जे लिहिले आहे त्यावरून त्यांची व परळ विभागातील लोकांची 'अटॅचमेंट' कळून येते. यातील प्रत्येक कथा आपल्याला जगण्याचा हुरूप देते व नकळत अशा परमेश्वर रूपी डॉक्टरांची विविध रूपे दाखवून देते.

हल्लीच त्यांचा आकाशवाणी मुंबईवर सुद्धा कार्यक्रम झाला. त्यातही त्यांनी आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत रूग्ण सेवा करीत राहून आपले आयुष्य रूग्णांसाठी समर्पित असल्याचे म्हटले आहे.


त्यांना त्यांच्या या यशामागे त्यांच्या मातोश्री श्रीमती नलिनी गंडभीर व पत्नी स्मीता यांचा पाठींबा असल्याचे ते आवर्जुन सांगतात.

त्यांना आमच्या अनेक शुभेच्छा !


प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर

– संपादक–





## प्रकाश झोत




**सायन इस्पितळाचे निवृत्त अधिष्ठाता डॉ. एस्. व्ही. नाडकर्णी यांच्या नावे तेथील नूतनसभागृहाचे नामकरण.**

सायन इस्पितळाचे माजी अधिष्ठाता **डॉ. सदानंद विनायक नाडकर्णी** हे एक निष्णात शल्यविशारद आहेत. ते उत्तम प्रशासकही होते. ते अधिष्ठाता असताना त्यांनी इस्पितळामध्ये लक्षणीय सुधारणा केल्या होत्या. अपघातग्रस्त रुग्णाला पाच मिनिटात उपचार सुरू करण्याचे 'ट्रॉमा सेंटर' स्थापन केले. वैद्यकीय क्षेत्रासंबंधी त्यांनी बरेच ग्रंथही लिहिले आहेत. त्यांच्या प्रशंसनीय योगदानाबद्दल तेथील अत्याधुनिक शल्य केंद्राला '**डॉ. एस. व्ही. नाडकर्णी सर्जिकल सेमिनार हॉल**' असे नामकरण केले आहे.



**DR S.V.NADKARNI**

A detailed Article written by Dr. **S. V. Nadkarni's** daughter **Dr. Sangita Hemant Pikle** on her father will get published in our next Mukhapatrika - Jan to March 2024



# OBITUARY

**Late Shri Premanand Shankar Nadkarni**

11.08.1932 to 13.05.2023

Shri Premanand Shankar Nadkarni was born in Sadashivgad, Karwar Dist., North Karnataka. After completing his primary education in Sadashivgad High School, he completed his matriculation in Mumbai and completed his B.Sc. degree from Mumbai University. He also studied in Institute of Cost and Works Accountants of India (ICWA) and later joined G K W Ltd. He rose through the ranks to become Chief Financial Officer of G K W Ltd. He was conferred Presidentship of ICWA, Mumbai Chapter for one year.

Shri P. S. Nadkarni lived a life defined by excellence and service to others. He was on the Board of Directors in N K G S B Bank from Year 2000 to 2012. He was Vice-Chairman of The N K G S B Sangh and then became Chairman of The N K G S B Sangh from 2011 to 2016. He was Chairman of the N K G S B I & E Society from 1995 to 2006. He was instrumental in computerization of Sangh and Society Office.

Throughout his illustrious career, Shri P. S. Nadkarni made significant contributions to the field and profession he worked for, earning the respect and admiration of colleagues and peers alike. He was honored as an Honorary Member of The N K G S B I & E Society in the year 2007. He will be remembered by all of us for his dedicated service and contribution to our community.

From : **Devidas Nadkarni**

Chairman,

The N K G S B Education Society

## उलटा सदरा

जगातील सर्व महायुद्धे केवळ शुल्लक कारणामुळेच सुरू झाली हे आपणा सर्वांस पूर्णपणे माहीत आहे. केवळ एकाच्या अहंभावामुळे लाखो लोक मृत्युमुखी पडले. अनेक देश नेस्तनाबूत झाले.

स्वत:च्या मनावर ताबा असता, जरा ''**अहं**'' वृत्ती बाजूला सारून लोककल्याणाची थोडी तरी जाण असती, तर ही महायुद्धे टाळता आली असती. कोणी मला जरा समजावून सांगेल की, या ज्या आपत्ती सबंध जगाला भोगाव्या लागल्या त्या इष्टापत्ती! कर्मलिखीत आपत्ती!! नैसर्गिक आपत्ती!!! तसेच कालचक्राप्रमाणे नियमित येणाऱ्या आपत्ती, या सर्व कोणत्या प्रकारच्या आपत्ती असाव्यात व त्यांच्या निवारणाबद्दल कशा प्रकारच्या योजना आहेत? या झाल्या सर्व जागतिक आपत्ती. पण अशा आपत्ती स्वत:च्या खाजगी आयुष्यातही येतात. केवळ १० x १२ च्या खोलीतसुद्धा एखादे महायुद्ध घडू शकते! एकच उदाहरण देतो आणि त्या दयावान परमेश्वराकडे प्रार्थना करतो–हे दयावान! अशा आपत्ती माझ्या वैऱ्यालासुद्धा भोगण्याची वेळ येऊ देऊ नकोस!

सकाळपासूनच मी अतिशय चांगल्या मुडमध्ये होतो. ज्या भेटीकरिता मी जवळ जवळ दोन–तीन वर्षे तळमळत होतो, ती वेळ केवळ दोन–तीन तासावरच येऊन ठेपली होती. कुठले कपडे घालायचे, केसाला भांग कसा पाडणे यावरच बरेच दिवस काल्पनिक तसेच प्रात्यक्षिक प्रयोगसुद्धा करून झाले होते. शेवटी तो दिवस उगवला! एक आठवडा आधीच लाँड्रीतून चकाचक करून आणलेला सदरा–पायजमा बाहेर काढला. आरश्यातून सर्व बाजूंनी, सर्व अँगल्सनी बारीक निरीक्षण केले आणि मनोमन स्वत:चेच कौतुक केले.

ती भेट अगदी मनासारखी झाली होती! घरी परत येईपर्यंत मन अगदी हवेतच तरंगत होते. सर्वांनी मोठ्या उत्सुकतेनं विचारले की, भेट कशी झाली? किती टनाच्या ऑर्डर्स मिळाल्या? काय भावाने?

इतक्यात कोपऱ्यात बसलेली आमची शैजारीण चित्कारली–''अय्या चंद्रकांत भावोजी! तुम्ही मिटींगला जाताना सदरा उलटाच घालून गेला होतात! तुम्हाला कोणी काही म्हणाले नाही? माझी पत्नी एका हातात चहा घेऊन मोठ्या आनंदाने माझ्याजवळ येत होती. एका सुंदर चंदेरी साडीची खरेदीसुद्धा तिच्या मनाने करून टाकली होती. पण हे शब्द कानावर पडताच जागेवरच थबकली! तो चहाचा कप तिच्या हातून कसा गळून पडला व त्याचे तुकडे तुकडे झाले हे सर्वांना त्या तुकड्यांच्या आवाजानेच जाणवले.

नजरेसमोर असलेले कॅलेंडर दिसू लागले. भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला संबोधित करीत होते – ''हे पार्थ, आता फारच कठीण प्रसंग आहे! तुला तुझ्या आप्तांशीच जीवनमरणाचा संग्राम करावा लागेल! तुझी यातून सुटका होण्याचा दुसरा मार्ग मला दिसत नाही.'' मलाही भलतेच काही दिसत होते. माझी अवस्था मलाच बघवत नव्हती. काय वर्णन करू मी त्या अवस्थेचे!

एकाद्या मटनवाल्याच्या दुकानाबाहेर सोललेले बोकड टांगलेले असतात, एवढी परिस्थिती माझी निश्चितच झाली नाही. माझ्या बायकोच्या दृष्टीने ही सोललेल्या–टांगलेल्या बोकडांची शिक्षासुद्धा फारच सौम्य होती. पण इतरांनी तिला केवळ मला ताकीद देऊनच सोडण्यास मजबूर केले व मी आज आपल्यासमोर उभा आहे आणि हा कबुलीजवाब देत आहे.

माझे एक मन सांगत होते की, झाले त्यात एवढे गैर काय झाले? हा तरुण–तरुणींच्या तारुण्यसुलभ भावनांचा केवळ एक उद्रेक आहे. त्यात एवढे वाईट वाटणे आवश्यक आहे काय? रोज पापलेटच्या आमटीने जेवणे किती किळसवाणे ठरेल व एखाद्या दिवशी केवळ वरणभाताने



सुद्धा अंतरात्मा तृप्त होऊ शकतो! शिवाय जे झाले ते तारुण्य सुलभच झाले, त्यात दोष देण्यासारखे काय आहे?

माझे दुसरे मन उफाळून वर आले आणि म्हणाले, अरे वा! चांगलाच मतलबी दिसतोस!! ह्या तारुण्य सुलभ गोष्टी काय फक्त तुलाच लागू पडतात? तुझ्या बायकोला नाही? केवळ नवऱ्याशी एकनिष्ठ राहणे हेच तिचे ध्येय असेल? तिलाही पापलेटची आमटी सोडून कधी वरणभात खायची इच्छा होऊ शकत नाही का? पण तुला ते सहन होणार नाही व या गोष्टीस तुझी संमती मिळणे शक्यच नाही. तेव्हा तुला मान्य नाही ते इतरांना मान्य असेल, असे तू कसे ठरवू शकतोस?

इतकी वर्षे शांतपणे विचार करून आणि बरेच प्रत्यक्ष अनुभव घेऊन, माझे अगदी ठाम मत झाले आहे की, अशा क्षणिक आनंददायी वाटणाऱ्या प्रकारांनी आपली मन:शांती खरोखरच कायमची नष्ट होते!

अशा प्रकारच्या, स्वत:च ओढवून घेतलेल्या आपत्ती निवारणार्थ, काहीच शास्त्रोक्त उपाय योजना नाहीत. त्याचे दुष्परिणाम भोगावेच लागतात, त्यातून सुटका नाही!

**–अरुण भास्कर कसबेकर**
मोबाईल – ९८२०२९१३६५

अरुण भास्कर कसबेकर यांच्या '' **कवडसे मनाचे** '' ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.

ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.



## "MERI MATI MERA DESH"

On the eve of 11.8.2023, "Meri Mati Mera Desh" Abhiyan of Bharat Sarkar was organised at BMC "A" ward for the felicitation of Freedom Fighter's relatives for which Mr. Mangesh Palekar was invited as the "Chief Guest" along with two other Navy personnel. Thereafter, Mr. Mangesh Palekar hoisted the National Flag of India. The Assistant Commissioner of BMC "A" ward, Fort, felicited him by giving a shawl, coconut and a bouquet of flowers.

**Mr. Mangesh Palekar is sharing some of the photos of the event below:**






## SHREE HOMOEPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**


Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**

**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**



# DN “ एक कर्मयोगी”

गेल्या महिन्यात DN च्या Mrs. गेल्याची बातमी ऐकली. DN ना भेटायला त्यांच्या घरी गेलो असता त्यांना स्वत:ला हॉस्पिटलमध्ये admit केलं होतं असं कळलं. त्यांना नेहमी हसतमुख व उत्साही पाहिले असल्याने, त्यांना त्या शारीरिक व मानसिक परिस्थितीत पाहून मन खिन्न झाले. दोन तीन आठवड्यांनी त्यांना माझ्या पत्नीबरोबर मी भेटायला गेलो असतांना त्यांची प्रकृती थोडीफार सुधारलेली दिसली. आता मी पुन्हा त्यांना भेटायला जाईन तेव्हा ते पूर्वीप्रमाणे उत्साही असतील व त्यांची तब्येतही चांगली असेल अशी आशा करतो. जुलै महिन्याच्या मुखपत्रिकेत अनेकजणांनी त्यांच्यावर लिहिलेल्या, ४५ वर्षाच्या कारकीर्दीबद्दल व्यक्त केलेल्या भावना आणि प्रतिक्रिया वाचल्या. त्या स्फुर्तीने DN च्या माझ्यावरील झालेले संस्कार आणि अनेक वर्षातील माझ्या वैयक्तिक संबंधांबद्दल मला लिहावेसे वाटले.

**DN** च्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंपैकी काही पैलूंवर मला लिहावेसे वाटते.

**DN** शिक्षणाने व पेशाने Structural Engineer होते, हे आज कदाचित अनेक जण विसरले असतील. या क्षेत्रातील अनेक कठीण आणि महत्त्वाच्या कामांसाठी त्यांना एक कुशल अभियंता म्हणून कायम बोलावणे यायचे. त्यांच्या बरोबर आणि त्यांच्या हाताखाली काम केलेल्या काही जणांबरोबर माझे चांगले संबंध आहेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे अशा कठीण कामांवर DN ची नियुक्ती व्हायची. काही दिवसांपूर्वी रवी मांद्रेकर (engineer व क्रिकेटमधील तज्ञ) यांनी सांगितल्याप्रमाणे त्या दोघांना कंपनीच्या एका महत्त्वाच्या कामासाठी बडोद्याला तातडीने जावं लागलं. त्या दोघांनी तो प्रवास train मध्ये उभे राहून केला. बहुतेक सर्व वेळ त्यांनी ज्ञातिबद्दल, क्रिकेटबद्दल आणि कामाबद्दल गप्पा मारून व्यतीत केला. यावरुन त्यांची कामावरील निष्ठा आणि सहकार्यांबद्दलचे प्रेम प्रतीत होते. भाषेवर त्यांचे प्रभुत्व होतेच, पण गणितावर आणि अनेक खेळांवर प्रेम असल्याने वयाच्या ७५–८० व्या वर्षी माझ्या पत्नीला गणितातील कोडी घालणे, ती कशी सोडवायची याची तार्किक विचारधारा मांडणे, इत्यादी गोष्टी ते अत्यंत मनापासून, तळमळीने करत. मला स्वत:ला ते नेहमीच फोन करून महत्त्वाच्या सामन्यांबद्दल आठवण करायचे आणि एखादी चांगली match झाल्यावर आपला आनंद व्यक्त करायचे.

त्यांच्या संपादकीयातून त्यांचे अनेक विषयांवर असलेले विचार आणि त्याच बरोबर ज्ञातीतील इतरांचे त्यांना पटलेले किंवा न पटलेले विचार यांचा समन्वय प्रतिबिंबीत होई. त्याच बरोबर त्यांचा ज्ञातीतील लोकांबरोबर असलेला घनिष्ठ संपर्क व जाणवणारी ज्ञातिबद्दलची आत्मीयता दिसून येई. त्यांनी ४५ वर्ष अखंडीत, वाचनीय व लोकाभिमुख अशी मुखपत्रिका संकलीत केली. आपल्या ज्ञातीला एकत्र जोडण्यात व बांधून ठेवण्यात त्यांचे खूप मोठे योगदान आहे. माझ्या व्यक्तिगत अनुभवांवरून त्यांचे व्यक्तिमत्व किती दिलदार व ध्येयवादी आहे याची मला प्रचिती आली. त्यापैकी काही अनुभव आपल्याला सांगावेसे मला वाटते. मी बँकेचा अध्यक्ष असताना संघाच्या कार्यकारीणीवर काम करावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी त्या संदर्भात मी संघाची कशी मदत करू शकतो यावर आम्हां दोघांचे विचार विनिमय झाले. आम्ही, पुढील दहाबारा वर्षांनी काय



अनुकूल उद्दिष्टे ठेवता येतील याबद्दल विस्तारीत चर्चा केली. माझे विचार त्यांना पटल्यावर त्यांनी अनुमोदक म्हणून मला संघाच्या निवडणूकीचा form भरून द्यायला मदत केली व form संघाच्या कमिटीला सुपूर्द केला. जेव्हा त्यांच्या लक्षात आले की संघाच्या कमिटीत माझ्या नावाला पाठींबा नव्हता तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले व दु:ख झाले. अजूनपर्यंत संघाची निवड बिनविरोध (uncontested) झालेली असल्याने माझ्या एका उमेदवारीमुळे निवडणूक घ्यायला लागेल असं जाणवल्याने व माझे अनुमोदक ते असल्याने संघाच्या कार्यकारिणीच्या विरुद्ध आहे असं झाल्याने त्यांची कोंडी झाली. त्यांनी माझी भेट घेऊन आपली द्विधा अवस्था बोलून दाखवली. ते अतिशय disturb झाले होते. निवडणूक उमेदवार अर्ज परत घेण्याची तारीख उलटून गेली असूनसुद्धा मी माझा अर्ज संघाच्या अध्यक्षांना भेटून मागे घेतला व संघाची निवडणूक पुन्हा एकदा बिनविरोध झाली. बँकेच्या एका निवडणुकीत बँकेचे आधीचे अध्यक्ष सुरेश बोरकर यांना बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाच्या विरुद्ध Panel मध्ये निवडणूक लढवण्याची वेळ आली, त्यावेळी DN नी स्वत:हून आपल्या ज्ञातितील आणखी काही व्यक्तींचे panel करून निवडणूक लढवण्यास पूर्ण मदत केली. त्यावेळी पारल्यातील election booth वर आमच्या प्रतिस्पर्धी panel चे प्रतिनिधित्व करत असतांना खिलाडू वृत्तीने माझ्याबरोबर उभे राहून माझ्या विरुद्ध कुठलीही कटुता न आणता प्रचार केला.

वरील दोन उदाहरणांवरून आपणास लक्षात येईल की आपण समाजातील कोणत्याही गोष्टींवर एखादी भूमिका घेतल्यास त्यात आपल्याला पटेल पण कटुता येणार नाही अशी वागणूक फार थोड्या लोकांची असते. मागे वळून बघताना त्यावेळी त्यांनी सुरेश बोरकरांना केलेली मदत व त्यांचे संचालक पदावर असण्याची गरज आणि DN चं कसं बरोबर होतं व माझं कसं चुकलं याची प्रचिती आली. त्याचप्रमाणे निवडणुकीनंतर त्या प्रसंगाबद्दल कधीही उच्चार न करता आमच्या वैयक्तिक संबंधात कुठेही दुरावा न येण्याची काळजी DN नी कायम घेतली.

संघाच्या बऱ्याचशा देणगीदारांच्या प्रशंसा करणे, त्यांच्या घरी जाऊन आभार मानणे, मुखपत्रिकेद्वारे त्यांना गौरविणे अशा अनेक गोष्टी त्यांनी केल्या. वरील उदाहरणांवरून मला एवढेच सांगायचे आहे की DN केवळ मुखपत्रिकेचे संपादकच नव्हते तर व्यवसायाने एक कुशल व यशस्वी अभियंता (engineer) होते. आपल्या देवी पॉवर गॅस कंपनीतील कार्यकालाची वर्षे अनेक महत्त्वाच्या landmark (मैलाचे दगड) कामांसाठी वापरली. ज्ञातीबद्दल आपली आत्मीयता नुसती मनात न बाळगता आपल्या कृतीतून आणून समाजातील अनेकांना त्यांनी मदत केली. त्यामुळे त्यांची ‘संपादकीय’ हे केवळ वाचनीय नसून त्यातील पुढील पिढ्यांना स्फूर्तीदायक ठरावं व त्यांनी यशस्वी व्हावं (अशी अनेक उदाहरणं वाचून) यासाठी पूरक ठरली. माझ्यासारख्या व्यक्तीला / वाचकाला जे पुस्तकी ज्ञानातून घेऊ शकत नाहीत पण दुसऱ्याच्या कृतीतून शिकू शकतो, त्यांचा हा प्रवास पुस्तकी ज्ञाना पलीकडे जाऊन आपल्या सर्वांच्या हातून काही समाज कार्य व्हावे यासाठी स्फूर्तीदायक ठरला. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर ‘‘देव त्यांचे बरे करो.’’

**– महेश रामदास आरस, विले पारले (पूर्व)**

## DNN : MY HEARTFELT RESPECTS

DNN as he was fondly called by all his near and dear ones, was very close to my parents Padmakar and Sindhu Dubhashi. My mother who hailed from Karwar, studied at Hindu High School and she and DNN were contempories; so where ever they would meet, some common names of teachers or classmates or about "Karwarians" would creep in the conversations.

DNN for a very long period was the editor of our Mukhapatrika, which he enjoyed doing. He would meticulously note all the achievements of members of our community. When my father was awarded the "Padmabhushan" for his meritorious civil service, DNN wrote about it in the Mukhapatrika. Also when the Vice President Venkahia Naidu bestowed on my father the "Paul Apple by" award by Indian institute of Public Administration, new Delhi or when my father was appointed as the Vice Chancellor of Goa University, DNN did not forget to cover all the details. I am very grateful for his painstaking work which he did as his pious duty.

When we visited his house some years back, he and Maee, showered warm hospitality. I am very sorry to hear that the kind hearted maee passed away a few months back. My heartfelft condolences to the bereaved family.

We will miss DNNs editorial columns. I wish him good health and all the best.

**Dr. Medha Dubhashi**
Mobile : 9011116545.
34, "Padma Sindhu", Sahawas Society,
Karve Nagar, Pune - 52

### ☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺

**टीचर : सांग पळव्या तू ''मार्क्सवाद'' कित्याक म्हणतात ते ?**

**विद्यार्थी : तुम्ही माका ''कमी मार्कस्' दिवून नापास करनापुडे मगेलो आणि मागेल्या बापाय भितर जो वाद जाता ताका ''मार्क्सवाद'' म्हणतात.**

**विजय वागळे मो. : ९२२१६०७५७७**



## कारवारकडची ताजी खबर

आपण सारे कारवारकर ज्ञातीबांधव आहोत. आता कारवारकर म्हटले म्हणजे त्यात सदाशिवगड, कणसगिरी, माजाळी, अवरसे, अंकोला वगैरे ह्या सर्व कारवार लगतच्या परिसरातील ज्ञातिबांधव आलेच! आपण वरीलपैकी बहुतेकजण मुंबईत किंवा ठाणे, पुणे इत्यादी ठिकाणी आज अनेक वर्षांपासून स्थायीक झालो आहोत. ह्याला मुख्य निमित्त म्हणजे नोकरी–चाकरीसाठी. तरी आपल्या सर्वांची ''नाळ'' कारवारला जोडलेली आहे. म्हणून आम्ही या अंकापासून ''कारवारकडची ताजी खबर'' हे सदर प्रस्तुत करण्याचे योजिले आहे. ह्यात आपल्या कारवार मुलखातल्या ताज्या बातम्या देण्याचा आम्ही प्रयत्न करू. उदा. सुका बांगडा, सुकी सुंगट, सुकी मोरी, ताजी त्रिफळ, बेडगी मिरची, कसाय पावडर, आमसुल वा वटंबाची सोल, कोहळ्याच्या वड्या, उकडा तांदूळ, आंबा, कैरी, काजू वगैरे, ''साते बाजारात'' यांचे ''आजचे दर'' काय चालले आहेत याची एक झलक. तसेच तेथील नवीन घरांचे दर, नव्या घडामोडी, ''गणपती'' निमित्त मुंबईसाठी काही खास ट्रेन्स, वगैरे माहिती. यासाठी आम्ही मच्छींद्र कसबेकर तसेच अरुण (शांताराम) कुलकर्णी यांना दर अंकात काही माहिती देण्यास विचारले असता त्यांनी ते आनंदाने स्वीकारले आहे. मागील अंकात अनविज्ञपणे अरुण कुलकर्णींचा मोबाइल नंबर चुकीचा दिला गेला तरी तो पुढीलप्रमाणे आहे. ७९७२४६८७८२. याशिवाय आर्या दूर्गा, महामाई, नवदूर्गा यांच्या जत्रांचे वेळापत्रकही दिले जाईल. गणपती उत्सवासाठी स्पेशल ट्रेनचे वेळापत्रक गुगलमध्ये उपलब्ध आहे.

**: अलिकडचे सातेबाजारातील दर :**

१) सुका बांगडा–१०–बांगड्यांना –१०० रुपये
२) सुकी मोरी (मोठ्या आकाराची) – १२०० रुपये
३) सुकी सुंगट – ३ मापे भरून – १०० रुपये
४) त्रिफळा – एक जुडगा – २० रुपये
५) बेडगी मिरची – १ किलो – ४०० रुपये
६) कोहळ्याच्या वड्या – १ किलो – ६०० रुपये
७) उकडा तांदूळ – १ किलो – ५० रुपये
८) वटंबाची सोल – १ किलो – ८०० रुपये
९) आमसुलं – १ किलो – २५० रुपये
१०) कसाय पावडर (पिटो) – १०० ग्रॅम – ६० रुपये
११) काळ्या इरशाद आंब्याचा पल्प कॅन – ३५० रुपये (फॅक्टरी दर)

...असो. बाकी पुढील अंकी

**– प्रसाद कसबेकर**

# कारवारी पाककृती

लेखिका : सौ. माधवी कसबेकर (मृणाल)
पत्ता: B-1103, स्वप्नलोक टॉवर्स, पिंपरीपाडा, मालाड(पूर्व), मुंबइ-९७. मो.: ९९३०८५२४८५

**(१) कारवारी सांबार मसाला :**

**साहित्य :** २०० ग्रॅम धणे, तेवढ्याच मापाची बेडगी मिरची,(बेडगी मिरची ग्रॅमच्या हिशोबाने घ्यायची नाही.) अर्धी वाटी काळी मिरी, अख्खे मूग, अख्खे हरभरे, अख्खी काळी उडीद प्रत्येकी एक एक मूठ. २ चमचे (टी स्पून) राई, २ चमचे मेथी, २ ते ३ हळकुंड (हळकुंड नसल्यास २ चमचे हळद)

**कृती :** प्रथम कढईत धणे घेऊन मंद विस्तवावर भाजून घेणे. मिरच्या भाजून घेणे. नंतर सगळे जिन्नस वेगळे वेगळे भाजून घेणे. मात्र हळकुंड थोडे कुटून कमी तेलात परतून घेणे.
धणे मिरच्या मिक्सरमध्ये वाटून घेणे व मग बाकीचे जिन्नस (वेगळे) मिक्सरमध्ये वाटून घेणे. सगळे वाटून झाल्यावर परत मिरच्या धण्यासकट बारीक वाटून घेणे. हा मसाला मुळ्याची भाजी, फरसबी किंवा वालपापडी या भाज्यांमध्ये सुद्धा वापरावा. तसेच पापलेटची कळपुटी, इडलीच्या सांबारामध्ये वापरू शकतो. हा मसाला १ ते दीड महिना उत्तम राहू शकतो.

**(२) कारवारी बटाट्याची उडीद मेथी (बटाटा आंबट भाजी)**

**साहित्य :** तीन/चार मध्यम आकाराचे बटाटे, तीन-चार बेडगी मिरच्या, १ छोटा चमचा धणे, अर्धा चमचा उडीद, अर्धा चमचा तांदूळ, पाव चमचा मेथी, अर्धी वाटी नारळ, १ चमचा खोबरेल तेल, पाच-सहा वटांब्याची सोले (सोले नसल्यास चिंच चालेल. (एक लहान गोळा), पाव चमचा हळद, हिंग, गुळ व मीठ तसेच कडीपत्ता.

**कृती :** प्रथम बटाटे उभे चिरून घ्या. जरा जाडसर पातेल्यात खोबरेल तेल घाला. त्यात राई, थोडी उडीद डाळ, थोडी मेथी (५-६ दाणे) टाका. वरून कडिपत्ता घाला. फोडणी तडतडल्यावर बटाटे घाला. चांगले ढवळून घ्या. मग पाणी घालून बटाटे शिजवून घ्या. मग चवपुरते मीठ आणि गुळ घाला.

**वाटण :** धणे, मिरच्या थोड्या खोबरेल तेलात भाजून घ्या. नंतर उडीद डाळ, मेथी आणि तांदूळ थोडे भाजून घ्या. ओले खोबरे, धणे, मिरच्या, हळद मिक्सरमध्ये एकत्र गंध वाटून घ्या. मग त्यात उडीद मेथी व तांदूळ टाकून परत मिक्सरचे एक बटण फिरवा. जास्त बारीक करू नका. मग हा सगळा मसाला शिजलेल्या बटाट्यात घाला. मसाल्याचेच पाणी घाला. जास्त पातळ करू नका. दाटसर राहू द्या. शेवटी उकळी काढा. झाली बटाट्याची उडदमेथी तय्यार!


**☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺**

**टीचर : "चीन" देश कित्याक क्रिकेट खेळ ना?**
**विद्यार्थी : कारण सगळ्याले चेहरे सारखेच असतात, तशीकरनं जो आऊट जातलो तोच परत तोंड धुवून येवचे भय उरता!**

**विजय वागळे मो. : ९२२१६०७५७७**



MSIPL
MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD
402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444





Can we help you to achieve your goal???
& your goal is....
Let's reach nearer
To your highest GOAL!!!
Step by step....




*A little every month grows to something significant over time!!!*
*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




*Indian Equity market has given avarage 16% return s in last 32 year s...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

## "THE GOUD SARASWAT BRAHMIN - THEIR FOOTPRINT"
### *एक संग्राह्य संदर्भ ग्रंथ*

गोमंतकातील मंदीराचा ज्ञानकोष म्हणजे सुपरिचित श्री. विनायक नारायण शेणवी धुमे यांचे चिरंजीव श्री. चंद्रकांत धुमे हे सुद्धा बहुश्रुत आहेत. त्यंनी मागे श्री. मंगेश महाजनांसाठी मार्गदर्शिका हा एक वाचनीय व संग्राह्य ग्रंथ प्रकाशित केला होता. अलीकडेच त्यांचा वर नमूद केलेला आणखी एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. ऋषिवंश ते गौड सारस्वत ब्राह्मण, मातृभूमि, ब्रह्मावर्त, वंशावळ, अग्नीहोत्र परंपरेपासून पंचायतन, मूर्तिपूजा, शैवापासून स्मार्त व वैष्णव सांप्रदाय. शाकाहारी ते मत्स्याहारी इत्यादी अनेक स्थित्यंतरांवर त्यांनी विस्तृत उहापोह केलेला आहे. त्यामुळे हा ग्रंथ वाचनीय व संग्राह्य झाला आहे.

**"The Goud Saraswat Brahmin - Their footprint"**

पृष्ठ संख्या ३०० + परिशिष्टे, मुल्य रुपये ८००/-. आपल्या इष्ट देवतांना किंवा कुलदैवतांना देणगी दाखल उपलब्ध. बारीक ग्रंथासाठी गौ. सा. ब्राह्मणांच्या मंदिरात वा मुंबईत द. ना. नाडकर्णी, पारले. मोबाईल – ९९६९००७२६० ह्यांना संपर्क करावा.

## श्रीमंगेश

**मंगेश माझें कुलदैवत,**
**मंगेश माझा भगवंत,**
**मंगेशापायी जडो चित्त ।**
**मंगेश नामस्मरण नित्य,**
**मंगेश हेंचि परम सत्य,**
**मंगेश प्रेम वसो हृदयांत ।**
**मानवसेवा हेचि तत्व,**
**मंगेश वसो मम आत्म्यांत,**
**मंगेश भक्ती राहो सतत ।**
**राम म्हणे, माझ्या कुलदेवा!**
**रक्षण करण्या मजला धावा!**

कवी – **राम कुलकर्णी 'उदय'**,'मूळगांव, चेंडिये (कारवार)
पत्ता :'राम-सीता', सरस्वती बाग, सोसायटी रोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६०.
**मोबाईल : ९७६९०३२००९ / टेलि. : ०२२-२८२२५१६०**

### विवाह /वाङ्‌निश्चय

१) तोषल तुषार फेणे, जोगेश्वरी व सोनल गजानन नायक, प्रभादेवी
२) अपूर्व मनोज कुलकर्णी, ठाणे व उमा रवींद्र फोगेरी (गोवा)



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.


SERVICE FIRST®

98193 04599 99204 04599

सर्वप्रथम सेवा®
SOCIETY SERVICE RESOURCE

## गंगाताई : एक सोज्वळ व्यक्तिमत्त्व

एक पिढी होती जी आपल्या नात्यातल्याच नव्हे तर बिननात्यातल्या माणसांवरही भरभरून मायेचा वर्षाव करत. त्या पिढीतील एकेक जण वयोमानापरत्वे कालांतराने पडद्याआड जाऊ लागले. परंतु देवकृपेने जे हयात आहेत त्यापैकी कारवारच्या दिवेकरांची सुकन्या गंगा ऊर्फ वाघ घराण्यातील स्नुषा अंबिका श्रीधर वाघ या. आम्ही तिला भाभी म्हणतो. २७ ऑगस्ट २०२३ रोजी भाभीने आयुष्याचा शंभरावा उंबरठा ओलांडून आणि आता तिची शतकोत्तर वाटचाल सुरू झालेली आहे. आयुष्याच्या शतकी पर्वात सुखाबरोबरच आलेल्या दुःखद किंवा कठीण प्रसंगांना म्हणा ती धीराने सामोरी गेली. सेवा हा तिचा स्थायी भावच जणू! त्यामुळे घरातील वृद्ध, आजारी आप्तांची मनोभावे सेवा करताना तिने चेहऱ्यावरील स्मितभाव कधी मावळू दिले नाहीत की कपाळावर आठीला स्थान दिलं नाही. सदैव हसतमुख राहून पाहुण्यांच्या सरबराईला तत्पर हे विशेष : जीवनात सर्वांशी जुळवून घेऊन गोडीगुलाबीने कसं जगावं, हे शिकावं तर तिच्याकडूनच! हसरे डोळे, चेहऱ्यावर कायम विलसवार गोड स्मितहास्य, जीभेवर रुळणारी गोड वाणी ही तिच्या व्यक्तिमत्त्वाची बलस्थानंच म्हणावीत अशी. कारवारला आली की मैत्रिणीच्या नात्याने ती माझ्या आईकडे आपलं मन मोकळं करायची. अजूनही फोनवर माझ्याशी बोलताना ती माझ्या आई-काकांच्या 'मोगाळपणाचे' अनुभव सांगताना सद्गतित होते.

मी तिला भेटायला पवईला गेल्यावेळी मला मोहन वाघांचं पुस्तक वाचायला पाहिजे असल्याचं तिच्याकडे बोलून गेले. (ती मोहन वाघांची मावशी) तिच्याकडे ते नव्हतं. तिने तिच्याकडील मोहन वाघांचंच दुसरं पुस्तक दिलं. आणि ते पुस्तक मिळवून देईन असा शब्द दिला. ते मिळवण्यासाठी तिने किती खटपट करावी? प्रत्येक कॉलवर आपल्याला ते पुस्तक न मिळाल्याबद्दल ती हळहळ व्यक्त करायची. तिच्या या स्वभावास कोणतं नाव द्यावं? शेवटी मोहनदादांच्या पत्नीकडे असलेली शेवटची एकमेव प्रत तिच्याकडून घेऊन मला ती पाठवून दिली. अशी ती शब्दाची पक्की!

माणूस नव्वदीच्या घरात पोहोचला की तो परस्वाधीन झालेला असणार असा समज सर्वसाधारणपणे समाजात दृढ झालेला असतो. परंतु भाभीने या समजाला सपशेश छेद दिलेला आहे. गुडघेदुखीमुळे तिला काठीचा आधार घ्यावा लागतो एवढंच. पण ती अजूनही स्वतःची कामं स्वतःच करते. त्या दिवशी बोलताना म्हणाली, मला स्वैपाक करायला सांगितला तर तोही मी करेन. शतक पार केलेल्या या उमेदी 'तरुणी'चे आत्मविश्वासाचे बोल सत्तरीतल्या या 'म्हातारी'ला लाजवून गेले एवढं मात्र खरं! बहुतेक वाढत्या वयात माणसाची साथ सोडणाऱ्या स्मरणेंद्रिय, श्रवणेंद्रिय यांनी तिची साथ सोडलेली नाही ही देवकृपाच आहे. म्हातारपण म्हणजे दुसरं बालपण ही उक्ती तिने सपशेल खोटी ठरवलीय. सोज्वळ, निर्मळ, प्रेमळ अशा तिच्यात अंगभूत असलेल्या गुणांमुळे ती सर्वांची आवडती असणे हे स्वाभाविक आहे. शतकपूर्ती केल्याच्या निमित्ताने एन्.के.जी.एस्.बी. संघातर्फे तिचा तिच्या निवासस्थानी जाऊन यथोचित सत्कार केला हे अभिमानास्पद आहे.

सर्वांसाठी चंदनाप्रमाणे झिजण्यातूनच तिच्या मनाला मिळणारा आनंद हेच तिच्या दीर्घायुष्याचं गमक असावं असं मला वाटतं. सर्वांची पापं पोटात घेऊन वाहती राहणाऱ्या गंगामातेसारखीच – सर्वांची उणी-दुणी मनातच रिचवून आपल्या कर्तव्यात कसलीही कसर न ठेवता संसार-सरितेत वाहून घेतलेल्या या गंगाभाभीला मनःपूर्वक प्रणाम! तिच्या आयुष्याची शतकोत्तर वाटचाल निरामय, निष्कंटक असो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**– मीरा निशीथ प्रभूवेर्लेकर**, गोवा.



## श्रीमती अंबिका श्रीधर वाघ (लग्नाआधीच्या गंगा दिवेकर) यांनी दिनांक २७ ऑगस्ट २०२३ रोजी वयाची शंभरी पार केली.

त्यांच्या सत्काराप्रीत्यर्थ दि एन.के.जी.एस.बी संघ व दि एन.के.जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्युकेशन सोसायटी मार्फत अनुक्रमे श्री. प्रसाद कसबेकर व श्री. देवदास नाडकर्णी यांनी दिनांक २ सप्टेंबर २०२३ रोजी त्यांच्या राहत्या घरी जाऊन त्यांचा परंपरेनुसार श्रीफळ, शाल, बुके व मिठाईसह संघाचे ''स्मृतिचिन्ह'' तसेच एज्युकेशन सोसायटीचे '' स्मृतिचिन्ह'' देऊन गौरव केला. त्यांची कन्या पूनम व जावई एडव्होकेट मसुरेकर ह्यांच्या संपूर्ण सहकार्यानेच हे कार्य यथोचितरित्या पार पडले.

गंगाताईंचा आशीर्वाद घेताना त्यांना असेच आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभो अशी श्री मंगेश व श्री शांतादुर्गा यांचे चरणी विनम्र प्रार्थना करून आम्ही निरोप घेतला.



**श्री. देवदास नाडकर्णी (चेअरमन) सोसायटीच्या वतीने स्मृतिचिन्ह देताना**



**श्री. प्रसाद कसबेकर (संपादक, मुखपत्रिका) संघाच्या वतीने स्मृतिचिन्ह देताना**



**श्रीमती अंबिका(गंगाताई) वाघ यांना शाल घालतानाचा फोटो.**

८९ वर्षांपूर्वीचा राजाराम पुरुषोत्तम (रायण्णा) मुझुमदार व सुशीला सुभाव दिवेकर यांच्या विवाह प्रसंगी दिवेकर कुटुंबियांचा फोटो



मागे उभे : उमा नागेश दिवेकर, लीला गोविंद (डेन्टीस्ट) नाडकर्णी
खुर्चीवर : वत्सला, देवीदास, राजाराम, सुशीला, मारुती, अंबिका (गंगा) श्रीधर वाघ
जमीनीवर : विमल वैकुंठ कसबेकर, मोहिनी भालचंद्र कसबेकर, शैलजा (यमुना) जयवंत कामत, मोहन वाघ (फोटोग्राफर) (यातील मारुती व गंगा ह्यात आहेत)



REMINDER

## मुंबई मंच

मुंबई स्थित सर्व ज्ञातिबांधवांसाठी आपल्या संघाने २००८ मध्ये मुंबई मंचची स्थापना केली. त्यानंतर सतत दरवर्षी मुंबई मंच तर्फे विविध कार्यक्रम योजण्यात आले व त्याला आपणा सर्वांचा प्रचंड प्रतिसादही लाभला. (उदा. जोगेश्वरी मेळावा वगैरे) याबद्दल आपणा सर्वांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

परंतु नंतर गेली काही वर्षे मुंबई मंचच्या उपक्रमामध्ये शिथीलता आली व कार्यक्रम होईनातसे झाले. आता पुन्हा आम्ही मुंबई मंचला जागृत करून काही ठोस उपक्रम उदा. सहली, मेळावे, सांस्कृतिक कार्यक्रम वगैरे करण्याचे योजित आहोत.

याबद्दल विवेक कुलकर्णींकडेही सविस्तर चर्चा होऊन आम्ही मुंबई मंच पुनश्च जिवीत करण्याचे योजिले आहे. तरी या अनुषंगाने तरुण–तरुणी तसेच वृद्ध, महिला या सर्वांनी हिरीरीने भाग घ्यावा व त्यासाठी नावे मुंबई मंच प्रीत्यर्थ आमच्या मुख्य कार्यालयात द्यावीत अशी नम्र विनंती.

तुमच्या प्रतिक्रिया लवकरात लवकर आम्हाला जरूर कळवाव्यात.

धन्यवाद!

### प्रतिसाद :

'**मुंबई मंच**' नेटाने पुढे नेण्याचे आमचे आद्य ध्येय आहे. यात अमीत श्रीकांत वाघ, पारले सारखे नवीन सभासद आम्हाला लाभत आहेत. त्यांनी स्वत: होऊन आणखी ३–४ मेंबर्सना ह्या मंचासाठी आणण्याचे घोषित केले आहे.

आम्हाला जितक्या लवकर जास्तीत जास्त असे ॲक्टीव्ह मेंबर्स मिळतील, हा मंच तितकाच वाढत जाईल. ह्याची वाढ व्हावी व अनेकानेक इव्हेंटस् या मंचातर्फे ह्या वर्षी व्हावेत ही मन:पूर्वक इच्छा.

खास करून भगिनींनाही ह्या लेखाद्वारे आव्हान करण्यात येत आहे की त्यांनीही हिरीरीने पुढाकार घ्यावा व मुंबई मंचाला पुढे नेण्यास सहकार्य करावे.

– **प्रसाद कसबेकर** – संपर्क **: मो.:९८२०५ ०१५५१**

## देणगीदारांना सूचना

✻ काही हितचिंतक संघाच्या बँक खात्यात देणगीदाखल रकमा जमा करतात. अशा व्यक्तींचा पत्ता व इतर तपशील उपलब्ध होत नाही. अशा देणगीदारांनी संघाच्या ऑफीसमध्ये तपशील पाठविण्याची कृपा करावी म्हणजे पावती बनवण्यास सोईस्कर होईल. (किंवा इमेल वर कळवले तरी चालेल.)

# निमंत्रण

**१. ठाणे मंच आयोजित नाचो, गाओ, मौज मनाओचा**

**बहारदार कार्यक्रम :**

**तारीख :** रविवार दि. २६ नोव्हेंबर २०२३

**वेळ :** संध्याकाळी ४ ते ७.३०

**ठिकाण :** तेंडुलकर सभागृह, माहीम, मुंबई

**कोण कोण भाग घेऊ शकतो :**

कलाकार सारस्वत ज्ञातीतील असावा, वयाचा विचार न करता बिनधास्त भाग घ्या. आपली कला सादर करा व प्रेक्षकांकडून वाहवा मिळवा.वेळेच्या बंधनामुळे, प्रथम नांव नोंदणी करणाऱ्यास प्रथम प्रवेश. तरी लवकरात लवकर नांवे नोंदवा

**ज्ञातिबांधवांस विनंती :** हेच निमंत्रण समजून सहपरिवार वेळेवर हजर रहा आणि कलाकारांना प्रोत्साहित करा. आपला उत्स्फूर्त सहभाग असेल तर ह्या कार्यक्रमाची शोभा वाढेल. याची आम्हाला खात्री आहे.

**ठाणे व जोगेश्वरी येथून प्रत्येकी एक बस दुपारी ठीक २.०० वाजता सुटेल.**

संपर्क :

**सुरेश पालेकर** – ८९२८८ ५०१९३
**राजेश दिवेकर** – ९६१९३ ६२४६०
**गिरीश रेगे** – ९९२२१ ६८७२५

## २. ठाणे मंच तर्फे १ दिवसाची सहल :

**दिनांक : रविवार ७ जानेवारी २०२४**

आकार : रुपये ८००/– प्रत्येकी.

(आपल्या बँकेच्या नौपाडा शाखा, खाते क्रमांक १८१६ मध्ये भरावयाची सोय.)

**स्थळ :** नंतर कळविण्यात येईल.

बस, प्रस्थान : ठाणे/मुलुंड, जोगेश्वरी, माहीम

संपर्क :

**सुरेश पालेकर** – ८९२८८ ५०१९३
**राजेश दिवेकर** – ९६१९३ ६२४६०
**गिरीश रेगे** – ९९२२१ ६८७२५



# पंढरीची वाट

*लक्ष लक्ष पाऊले चालती*
*पंढरीची वाट*
*टाळ, चिपळ्या वाजती*
*दुमदुमले आकाश ।*
*चंद्रभागेच्या तीरी*
*भक्तगणांचा मेळा*
*ज्ञानोबा, तुकाराम करी जयघोष*
*परमानंदाचा सोहळा ।*
*कानडा विठ्ठलु तो*
*विटेवरी उभा*
*वामांगी रखुमाई शोभे*
*दिसे दिव्य शोभा ।*
*भक्तिरसात रंगून*
*वारकरी होतो बेभान*
*ब्रम्हानंदी लागली टाळी*
*अद्वैताचे अभूत मिलन*
*ज्ञानोबाच्या अभंगाला*
*तुक्या नामाची जोडी*
*भक्तीचा महिमा मोठा*
*भवपाश आसक्ती तोडी ।*

**–कुंदा र. देसाई**

## शारदास्तवन

*नमोशारदे देवी,*
*वीणा वादिनी, वरदायिनी*
*वर दे मज आता ।*
*मांगल्याची तूच मूर्ती*
*कशी वर्णू मी तव महती*
*अजाण बालक अल्पमती*
*शरण येई देवी सरस्वती ।*
*तूच कर्ता, तूच करविता*
*विश्वमोहिनी, जगन्माता*
*शब्द फुलांची गुंफूनी कविता*
*अर्पिते चरणी तुज आता ।*
*नमो शारदेदेवी,*
*वीणा वादिनी, वरदायिनी*
*वर दे मज आता ।*

**–कुंदा र. देसाई**

## रानफूल

*पाऊल वाटेच्या कडेला*
*एक रानफूल डोले*
*स्वप्नी खुदकन*
*गाली हसले।*
*इवलासा देठ,*
*कोमल, मखमली पाती*
*वाऱ्यासंगे डोलतांना*
*घाली निसर्गाला भूल*
*क्षणभंगूर जीवन ।*
*रानफुला ठावे*
*परिहसत जगावे,*
*हसत मरावे*
*हे तर जीवन गाणे ।।*

**–कुंदा र. देसाई**

# श्रद्धांजली

## Mohan Shantaram Kasbekar

**Our Beloved Pappa**



**पाहता तुझला देवा पाहणे संपले**
**पाहुनिया डोळेभरी मन तृप्त झाले.**

**जन्म : २० एप्रील १९२० (सदाशिवगड)**
**निधन : १२ सप्टेंबर १९७२**
(ऋषिपंचमीला मध्यान्ही) पणजी, गोवा येथे.

पणजी येथील ''द नवहिंद टाईम्स' व 'नवप्रभा' वृत्तपत्रांचे ते सर्वेसर्वा होते व त्या आधी मुंबईमध्ये दिगंबर एन्. नाडकर्णींच्या 'फ्री प्रेस जरनल'मध्ये कार्यरत होते. पपा, तुम्ही वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी आम्हांला सोडून गेलात पण तुमचा आशिर्वाद सदैव आमच्या पाठीशी आजही खंबीरपणे आहे.

**– तुमचेच –**

पंकज (प्रसाद) मोहन कसबेकर, माधवी प्रसाद कसबेकर,
नवनीत मोहन कसबेकर, सुचीता नवनीत कसबेकर
व संध्या विलास सोहनी



# श्रद्धांजली



**श्रीमती संध्या कामत रायकर**
(कारवार)
यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त
**(त्यांचे देहावसान १८ ऑक्टोबर २०२२ रोजी झाले.)**

***दुःखद निधनाचे स्मरणार्थी :***
**श्रीमती श्यामला माधव कामत, (मातोश्री)**
**श्री. संजय रायकर (पती)**
**सान्निधी व संज्योत** (कन्या व पुत्र)
**ताई :** श्रीमती वनिता तसेच विनायक हेगडे, वामन हेगडे
**दादा :** रोहीत माधव कामत व श्रीमती रश्मी कामत
व रिया कामत मुळे

*तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।*
*असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुषः ।।*
*भगवद्‌गीता, तृतीयोध्याय:*



**श्रद्धांजली**



**पद्मभूषण डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी**
जन्म : ५ मार्च १९३०
देवाज्ञा : ३१ ऑगस्ट २०२०

**श्रीमती सिंधू पद्माकर दुभाषी**
देवाज्ञा १३ सपटेंबर२०२१
जन्म : २० सप्टंबर १९३८

*प्रेम देऊनी आम्हांला जवळ केले सर्वांना ।*
*उरली साथ तुमची, आठवणी येते क्षणाक्षणाली ।।*
*कल्पनेतही नव्हते तुमचे जाणे अधुरे राहिले जीवन गाणे ।*
*आता फक्त एकच उरले तुमच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहणे ।।*

**– मेधा, देवदत्त, अर्चना (नात), जय (पणतू) –**

**डॉ. मेधा दुभाषी – Head of Centre for Gender Studies**
**Vaikunth Mehta National Institute ofCo-operative Management, Pune, INDIA**


**A name that spells its class !**
# WINOVER
## CATERERS
**Marriages, Thread Ceremonies,**
**Engagement and Birthday Parties Etc.**
**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**
**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**
ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR

**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**

**Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057**




### संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या
### (मागील अंकानंतर )
### उल्लेखनीय देणग्या

**१) श्री प्रसाद बोरकर यांच्या तर्फे**
**दोन लाख रुपयांची देणगी :**

माहीम येथे राहणारे श्री. प्रसाद अंबीकाचरण बोरकर यांनी आपला ६० वा वाढदिवस आगळ्याप्रकारे साजरा केला. त्यांनी ह्या प्रसंगी आई–वडील श्रीमती सरोजिनी व अंबीकाचरण शिवराव बोरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दोन लाख रुपयांची देणगी दिली. त्यातील एक लाख रुपये वैद्यकीय सहाय्याप्रीत्यर्थ आहेत व उर्वरीत एक लाख रुपये वृद्ध सेवा निधीसाठी आहेत.
श्री. प्रसाद यांना ६० व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

**२) श्रीमती लक्ष्मी नारायण शिवेश्वरकर यांच्याकडून**
**एक लाख एक रुपयांची देणगी :**

पूर्वी अंधेरी येथे रहाणाऱ्या श्रीमती मालती माधव देसाई यांचे २५ वर्षापूर्वी निधन झाले होते. त्यांच्या पुण्यतिथीप्रसंगी नाशिक येते रहाणाऱ्या त्यांच्या सुविद्य कन्या श्रीमती लक्ष्मी नारायण शिवेश्वरकर यांनी समाज सेवा निधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी दिली आहे.

**३) श्री. किशोर सबनीस यांजकडून**
**५१ हजार रुपयांची देणगी :**

गेल्या पिढीतील सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे श्री. वासुदेव गजानन सबनीस हे एक कर्ते पुरुष वास्तव्यात होते. अरविंद गंडभीर हायस्कूलच्या जडणघडणीस त्यांचे भरीव योगदान होते. त्यांचे ठाणे येथे रहाणारे सुपुत्र श्री. किशोर सबनीस यांनी आई वडील श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री. वासुदेव व पत्नी श्रीमती सविता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वृद्ध सेवा निधीसाठी ५१ हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**४) श्री. मंगेश मुझुमदार यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी एज्युकेशन सोसायटीला**
**पन्नास हजार रुपयांची देणगी :**

पारले येथे राहणारे श्री. विनायक मुझुमदार यांचे वडील कै. मंगेश गोविंद मुझुमदार यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्या प्रसंगी त्यांनी वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**५) श्री. श्राकांत वाघ यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला**
**दीड लाख रुपयांची देणगी :**

पारले येथे राहणारे सँडोस या औषधी निर्मितीच्या उद्योगसमुहात उच्च पदावरुन निवृत्त झालेले श्री. श्रीकांत दत्तात्रय वाघ यांचे अलीकडेच निधन झाले त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री. अमीत श्रीकांत वाघ यांनी एज्युकेशन सोसायटीला दीड लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

(१) श्री. सचिन देवदास नाडकर्णी यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त
(२१ जून २०२३) आई श्रीमती शैला यांजकडून — ११,०००

(२) आई–वडिल व आजी–आजोबा यांच्या स्मरणार्थ
श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून — २१,०००

(३) श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून — ५०००

(४) जेष्ठ भगिनी श्रीमती रेखा रामानंद भट यांच्या पहिल्या
पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. शरद व श्री. प्रमोद मारुती बोरकर यांजकडून — ५०००

(५) श्रीमती मालती माधव देसाई यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त
कन्या श्रीमती लक्ष्मी नारायण शिवेश्वरकर यांजकडून — १,००,००१

(६) श्रीमती इंदीरा व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या
स्मरणार्थ पुत्र श्री. किशोर यांजकडून — ५०००

(७) एस्. एस्. कुलकर्णी, कारवार यांजकडून — ५०००

(८) श्रीमती आयुषी विनायक रेगे यांजकडून — ३०००

(९) हितचिंतकाकडून – (खालील तिघांच्या स्मरणार्थ)
(अ) श्री. सदानंद गणपत नाडकर्णी — १००१
(ब) श्रीमती पुष्पा पद्माकर तेलंग — १००१
(क) श्री. प्रेमानंद शंकर नाडकर्णी — १००१

### वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ

१) श्रीमती शांता (माई) व श्री. मंगेश (भाऊ) महेश्वर नेत्रावळी यांच्या
विवाह प्रसंगाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा रमेश वागळे यांजकडून — १७,०००

२) श्रीमती सरोजिनी व श्री अंबिकाचरण शिवराव बोरकर यांच्या
स्मरणार्थ पुत्र श्री प्रसाद याजकडून त्यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त — १,००,०००

३) श्री जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा याजकडून — २५,०००

४) श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शांता यांजकडून — २५,०००

५) श्री. शांताराम पुरुषोत्तम वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी
श्रीमती शैलजा यांजकडून — १०,०००



## वृद्ध सेवा निधीसाठी

१) श्रीमती राधाबाई वेंकटराव नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त नाती
श्रीमती शीतल व शिल्पा मधुकर नाडकर्णी यांजकडून — २,००१

२) बंधु श्री. श्रीकांत बळवंत बोरकर यांच्या स्मरणार्थ (आषाढी एकादशी)
श्रीमती नंदिनी व श्री. मिलिंद अनिल धोटींग यांजकडून — १०,०००

३) श्रीमती सरोजिनी व श्री. अंबिकाचरण शिवराव बोरकर यांच्या
स्मरणार्थ पुत्र श्री. प्रसाद यांजकडून त्यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त — १,००,०००

४) वडील श्री. वासुदेव गजानन सबनीस व आई श्रीमती स्नेहलता (चंपू)
वासुदेव सबनीस व पत्नी श्रीमती सविता किशोर सबनीस यांच्या
स्मरणार्थ श्री. किशोर वासुदेव सबनीस यांजकडून — ५१,०००

५) वडील आशुतोष पी. बोरकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती चारुता
आशुतोष बोरकर यांजकडून त्यांच्या८० व्या जन्मतिथीनिमित्त — १०,०००

६) श्री. मोहन दत्तात्रय बोरकर यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त
त्यांची पत्नी श्रीमती शांता बोरकर यांजकडून — १०,०००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१) श्री. मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी निमित्त कन्या
श्रीमती शीतल व शिल्पा यांजकडून — २,००१

२) श्रीमती माधुरी मधुकर नाडकर्णी यांच्या जन्मदिना प्रसंगी
त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शीतल व शिल्पा यांजकडून — २,००१

३) श्री. मंगेश गोविंद मुजुमदार यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुत्र
श्री. विनायक यांजकडून — ५०,०००

४) श्री. शांताराम पुरुषोत्तम वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी
श्रीमती शैलजा यांजकडून — १०,०००

५) श्री. श्रीकांत दत्तात्रय वाघ यांच्या स्मरणार्थ
त्यांचे सुपुत्र श्री. अमित श्रीकांत वाघ यांजकडून — १,५०,०००

**।। कालाय तस्मै: नम: ।।**

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | शांता अरुण भेंडे | शिद्दर | वांद्रे |
| | (पूर्वाश्रमीची शांता यशवंत ब्रुकबाँड कसबेकर) | | |
| २) | श्यामला अरविंद बोरकर | अंकोला | बेळगांव |
| | (पूर्वाश्रमीच्या श्यामला माधव मुजुमदार) | | |
| ३) | डॉ. श्रीकांत काशीनाथ बोरकर | कडवाड | दादर |
| ४) | प्रतिभा प्रभाकर गायतोंडे | हळगे | मुलुंड |
| ५) | मेधा विश्वनाथ गुंजीकर | माजाळी | पुणे |
| | (पूर्वाश्रमीच्या उषा श्रीपाद वागळे) | | |
| ६) | दिगंबर मारुती कसबेकर | खारगे | बेळगांव |
| ७) | जयप्रकाश राजाराम मुझुमदार | अंकोला | पुणे |
| ८) | अनघा राजेंद्र नाडकर्णी | सांवर पै | दहीसर |
| ९) | वनिता मोहन नाडकर्णी | मल्लापूर | मुलुंड |
| १०) | विश्वनाथ शंकर पालेकर | कडवाड | बोरीवली |
| ११) | अरुण प्रेमानंद पिंगे | कणसगिरी | ठाणे |
| १२) | शैलेश विनायक फेणाणी | चेंडिये | दादर |
| १३) | नलिनी गुरुदास तेलंग | हारवाडे | खार (पश्चिम) |
| १४) | गायत्री (कुंदा) उदय तेलंग | केरवडी | दादर |
| १५) | माधुरी सुरेश तेलंग | केरवडी | अंकोला |
| १६) | आशा (हिरु) वामन वाघ | सदाशिवगड | जोगेश्वरी |
| १७) | संध्या सुरेश वागळे | माजाळी | ठाणे |

## नवीन दूरध्वनी क्रमांका विषयी सूचना

संघाच्या ऑफीसचा दूरध्वनी क्रमांक (AIR TEL Landline) बदलण्यात आला आहे. तरी सर्व सभासदांनी नवीन नंबरची नोंद घ्यावी व या पुढे गिरगांव ऑफीसला खाली दिलेल्या नंबर वरूनच संपर्क साधावा.

**(जुने दोन्ही नंबर्स बाद करण्यात आलेले आहेत.)**

**धन्यवाद !** **– एन्. के.जी. एस्. बी. संघ**

**नवीन नंबर : ०२२ – ४७४९ ८२५९**



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.